# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस कं. ग्रागानिमं/नाशप/०३० /२०१०

अर्जदार : सौ. वेनूताई रामदास धंदर
राहणार वैशाली नगर, डिगडोह देवी,
तहसील हिंगणा, जिल्हा नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
विभाग कंमाक 2, नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती के.के. घरत
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

## आदेश

**दि. 05-05-2010**

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक ३०.०३.२०१० रोजी म.राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराच्या गा–हाण्याचा तपशील :–

1. दिनांक ३०.०३.२०१० रोजी सौ. वेनूताई रामदास धंदर राहणार हिंगणा यांनी विद्युत देयके दुरूस्त करण्याबाबत व कुठलीही पुर्व सूचना न देता दि. २६.०३.२०१० रोजी खंडीत केलेला विद्युत पुरवठा पुन्हा जोडण्याकरीता या मंचात गा–हाणे दाखल केलेले आहे. तसेच खालील प्रमाणे मंचाकडुन मदतीची मागणी केलेली आहे –

**अ.** सहाय्यक अभियंता यांना योग्य निर्देश देवून खंडीत असलेला विद्युत पुरवठा जोडुन देण्यात यावा.

**ब.** माहे जुन २००९ च्या अगोदरचे विद्युत वापर आणि नविन मिटर बसविल्यानंतर म्हणजेच डिसेंबर २००९ नंतरचे वापर विचारात घेवुन विद्युत देयके दुरूस्त करून देण्यात यावे.

**क.** पूर्व सूचना न देता विद्युत पुरवठा खंडीत केल्याबाबत तसेच विद्युत देयक वेळेत दुरूस्त न केल्याबाबत संबंधीत अधिका–यास दंडीत करण्यात यावे.

2. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनिमय २००६ च्या कलम ८.३ अन्वये विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यासंबधी अतंरीम आदेश पारीत करण्याकरिता ३१.०३.१० रोजी सूनावणीचे आदेश दिले. दि. ३१.०३.१० रोजी अर्जदार उपस्थित होते. गैरअर्जदाराने लिखीत कळविले होते की काही कारणास्तव ते हजर राहु शकत नाही. तरी दुरध्वनी व्दारे गैरअर्जदाराने मंचास कळविले जर अर्जदार चालु विद्युत देयक भरण्यास तयार असेल तर गैरअर्जदारास विद्युत जोडणी पूर्ववत जोडुन देण्यास काहीही हरकत नाही.

गैरअर्जदाराने विद्युत जोडणी करण्यास तयारी दर्शविल्यामुळे अंतरीम आदेश पारीत करण्यात आलेला नाही, व पुढील सुनावणी १५.४.२०१० रोजी ठेवण्यात आली.

3. दिनांक १५.०४.१० रोजी सुनावणी घेण्यात आली, दोन्ही पक्ष उपस्थित होते, अर्जदारातर्फे श्री प्रभाकर मोहोड हे प्रतिनिधी म्हणुन उपस्थित होते.

अर्जदाराने आपली बाजु मांडताना सांगितले की दि.३१.०३.२०१० रोजी त्याचा विद्युत पुरवठा जोडण्यात आला. परंतु विद्युत देयकाबाबतची तक्रार सध्या प्रलंबित आहे. विद्युत देयकाच्या तक्रारीविषयी त्यांनी सागितले की माहे जुन २००९ रोजी त्यांना अवास्तव विद्युत देयके देण्यात आल. तसेच माहे जुलै २००९ ते माहे नोव्हेबंर २००९ पर्यंत सदोष मिटर असलेले ३०९

युनिट प्रमाणे सरासरी वापराचे विद्युत देयके देण्यात आली. त्याबाबत अर्जदाराने जुन २००९ मध्ये डिंगडोह कार्यालयात संबंधीत अधिका–याकडे विद्युत देयकाबाबत तक्रार केलेली होती. संबंधीत अधिका–यांनी त्याविषयी चौकशी केली परंतु पुढे कुठलीही कार्यवाही केलेली नाही.

अर्जदाराचे असे म्हणणे होते की त्याचा दर महिन्याचा वापर ५० ते ६० युनिटच्या आहे परंतु माहे जुन २००९ मध्ये १५१४ युनिटचे बिल देण्यात आले ज्याची रक्कम रूपये ९,६५४/–होती. त्यानंतर मिटर सदोष असा शेरा असलेले विद्युत देयके, जुलै २००९ ते नोव्हेंबर २००९ पर्यंत देण्यात आले. हे सगळेच बिल चुकीचे आहे व त्याला ते मान्य नाही. तसेच ऑक्टोबर २००९ मध्ये कंपनीच्या कर्मचा–याच्या सांगण्यावरून अर्जदाराने रूपये ५०००/– भरलेले आहे. तरीही अर्जदाराच्या बिलात दुरूस्ती करण्यात आलेली नाही, माहे डिंसेबर २००९ मध्ये अर्जदाराचे मिटर बदलविण्यात आले व त्यानंतर त्याला युनिट प्रमाणे विद्युत देयके मिळाले.

4. सुनावणीच्या वेळीस गैरअर्जदाराने आपली बाजु माडंताना सांगितले कि दिनांक 15.03.2010 रोजी जुने मिटरची तपासणी/चाचणी केल्यानंतर असे लक्षात आले की ते दोष रहीत आहे व त्या आधारावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

5. परंतु अर्जदाराने चाचणी अहवालावर आक्षेप घेतला व म्हटले की चाचणीच्या वेळेस अर्जदारास कुठलिही सुचना दिलेली नाही व तो मिटर चाचणीच्या वेळेस उपस्थित नव्हता.

6. तेव्हा मंचाने असे आदेश दिले की अर्जदारासमोर पुन्हा मिटरची चाचणी करण्यात यावी.

7. दिनांक २१.०४.२०१० रोजी सदस्य–सचिव (ग्रागानिम), अर्जदार, गैरअर्जदार, कनिष्ठ अभियंता आणि उपकार्यकारी अभियंता (चाचणी विभाग) यांच्या समोर, मिटर चाचणी विभागात जुन्या मिटरची चाचणी करण्यात आली.

चाचणी अहवालानुसार मिटरपल्स बरोबर नव्हते, तसेच मिटर रिडींग अनपेक्षितरित्या वाढत होते. त्यामुळे मिटर सदोष आहे असे निदर्शनास आले.

## मंचाचे निष्कर्ष :–

दोन्ही पक्षकाराचे म्हणणे ऐकल्यावर, चाचणी अहवालाचे व इतर सर्व दस्ताऐवजाचे अवलोकन केल्यानंतर मंच अशा निष्कर्षावर पोहचला आहे की मिटर माहे जुन २००९ मध्ये नादुरूस्त झाले व ते नोव्हेंबर २००९ पर्यंत सदोष होते.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५, १५.४.१ नुसार सदोष मीटर बाबतची तरतुद अशी आहे की, जास्तीत जास्त 3 महिन्यांच्या कालावधीतील ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजीत करण्यात येईल.

## आदेश

अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येत आहे.

1. माहे जुन २००९ ते नोव्हेंबर २००९ चे विद्युत देयके रद्द् करण्यात यावे आणि हया कालावधीमध्ये फक्त 3 महिन्यांकरीता ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजीत करण्यात यावी.

समायोजन करण्याकरिता जुन २००८ ते नोव्हेबंर २००८ या कालावधीतील मिटरवर नोंदवल्या गेलेल्या विद्युत बिलाचा सरासरी वापर आधार म्हणून घेण्यात यावा.

आदेशाची अंमलबजावणी 30 दिवसांचे आंत करण्यांत यावी. तसेच कार्यपूर्तता अहवाल मंचास सादर करावा.

सही/–
(श्रीमती के.के घरत)
सदस्य – सचिव

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या्

सदस्य–सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.श.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर